Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 11/01/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## प्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर



विष्णू सखाराम खांडेकर हे प्रसिद्ध मराठी कथा-कादंबरीकार, लघुनिबंधकार आणि समीक्षक होते. त्यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ रोजी सांगली येथे झाला. त्यांचे शिक्षण सांगली व पुणे येथे इंटर आर्ट्सपर्यंत झाले. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांच्या चुलत चुलत्यांनी त्यांना दत्तक घेतले. १९२० मध्ये शिरोड्याच्या ट्युटोरिअल इंग्लिश स्कूलमध्ये प्रथम शिक्षक व नंतर मुख्याध्यापक या पदावर काम केले. खांडेकरांचे लेखन १९१९ पासून प्रकाशित होऊ लागले. त्यांनी 'कुमार' या टोपण नावाने कविता व 'आदर्श' या टोपणनावाने विनोदी लेख प्रसिद्ध केले.'घर कुणाचे' ही त्यांची पहिली लघुकथा १९२३ मध्ये महाराष्ट्र साहित्य या मासिकात प्रसिद्ध झाली. 'नवमल्लिका'(१९२९) हा त्यांचा पहिला कथासंग्रह.

खांडेकरांचे लेखन बहुविध स्वरूपाचे असून त्यात १५ कादंबऱ्या, ३१ लघुकथासंग्रह, १० लघुनिबंधसंग्रह, ६ रूपककथासंग्रह, १ नाटक यांशिवाय काही चरित्रात्मक /समीक्षात्मक ग्रंथ व संकीर्ण लेखसंग्रह यांचा समावेश होतो. तसेच त्यांनी मराठी, हिंदी व तेलुगू चित्रपटांसाठी एकूण १८ पटकथा लिहिलेल्या आहेत. 'नवमल्लिका', 'पाकळ्या'(१९३९), 'समाधीवरली फुले'(१९३९), 'नवा प्रात:काल'(१९३९) हे त्यांचे कथासंग्रह. तर 'हृदयाची हाक' 'कांचनमृग' (१९३१), 'उल्का' (१९३४), 'दोन मने' (१९३८), 'क्रौंचवध' (१९४२), 'अश्रु' (१९५४), 'ययाति' (१९५९) आणि 'अमृतवेल' (१९६७). या त्यांच्या कादंबऱ्या. 'धर्मपत्नी' हा तेलुगू चित्रपट व 'बडी माँ', 'दानापानी' यांसारखे हिंदी चित्रपट त्यांच्याच पटकथांवर आधारलेले होते. खांडेकरांच्या 'ययाति' या कादंबरीला साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यांच्या बहुतेक साहित्यकृतींच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. १९६८ मध्ये भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा किताब दिला. वि.स.खांडेकर यांचे २ सप्टेंबर १९७६ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jan 11, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401